पुणे महानगरपालिका
मा.प्रशासक
पुणे महानगरपालिका

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:२२/०५/२०२४

**पुणे महानगरपालिका**
**स्थायी समिती**
**कार्यपत्रिका क्र.८**

मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **शुक्रवार, दि.२४/०५/२०२४ रोजी, दुपारी ४:०० (चार) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय, चौथा मजला, पुणे महानगरपालिका भवन, शिवाजीनगर, पुणे** येथे भरेल.

मा. प्रशासक, पुणे महानगरपालिका यांचे निर्णयार्थ खालीलप्रमाणे विषय सादर करण्यात येत आहेत.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र.४६**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर-मुंढवा, वानवडी-रामटेकडी व कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयांकडील १४ मुद्द्यांबाबतची माहे एप्रिल २०२४ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र.४ यांचे जा.क्र.६२९,दि.२०/०५/२०२४ चे पत्र

**संकीर्ण**

**विषय क्र.४७**

पुणे पेठ वडगाव खुर्द स.नं. ४७/१अ/१क व ४७/१/२अ व वडगाव खुर्द स.नं. ५१ या मिळकती मधील २४ मी. डी.पी. रस्त्याने बाधित क्षेत्र व वडगाव खुर्द स.नं. ५५/१ येथील १८ मी. रुंद डी.पी. रस्त्याने बाधित क्षेत्र व पुणे पेठ धायरी स.नं. १८०/२ या मिळकती मधील ३० मी. डी.पी. रस्त्याने बाधित क्षेत्र या जागे संदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये दिलेल्या परचेस नोटीस नुसार भुसंपादनाची कार्यवाही सुरू करणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शआ/४१, दि.२१/०५/२०२४ चे पत्र.

**विषय क्र. ४८**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता र.रु.४९०.०० कोटी १२ महिने, ३६५/३६६ दिवस, ६ महिने/१८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी/जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रु.४९०.०० कोटी ७०% प्रमाणे मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.संकीर्ण- २०२४/प्र.क्र.१४/नवि-०४, दि.१४/०२/२०२४ नुसार राष्ट्रीयकृत बँकांसोबत ज्या खासगी बँका र.रु.१६००० कोटी पेक्षाजास्त नक्त मूल्य असणाऱ्या व Reserve Bank Of India यांच्या Domestic Systemically Important Banks च्या यादीत नावे असणाऱ्या खासगी बँकांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/४३,दि.२२/०५/२०२४ चे पत्र.

**विषय क्र.४९**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता र.रु.२१०.०० कोटी १२ महिने, ३६५/३६६ दिवस, ६ महिने/१८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी/जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रु.२१०.०० कोटी ३०% प्रमाणे मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.संकीर्ण- २०२४/प्र.क्र.१४/नवि-०४, दि.१४/०२/२०२४ नुसार राष्ट्रीयकृत बँकांसोबत ज्या खासगी बँका र.रु.१६००० कोटी पेक्षाजास्त नक्त मूल्य असणाऱ्या व Reserve Bank Of India यांच्या Domestic Systemically Important Banks च्या यादीत नावे असणाऱ्या खासगी बँकांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुले/४४,दि.२२/०५/२०२४ चे पत्र.

प्र.नगरसचिव
पुणे महानगरपालिका